MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

बीड /प्रतिनिधी

पेठ बीड पोलीस ठाणे निरीक्षक अशोक मुदिराज यांच्या जवळचा निकटवर्तीय समजला जाणारा हनुमंत उगले हा आपल्या स्वतःच्या खाजगी गाडीवर पोलीस नाव टाकून आपल्या पदाचा उपयोग करत रात्रीस खेळ चाले असाच एकजुना प्रयोग करत आहे हप्ते वसुली व पैसा कमी होण्यासाठी स्वतःच्या नाईट ड्युटी मध्ये पोलिसांच्या गाडीचा वापर न करता आपल्या खाजगी गाडीचा म्हणजे स्विफ्ट कार मध्ये रेडमी पोलीस ठाण्याचा हनुमंत उगले नावाचा पोलीस कर्मचारी फिरतो आणि राजरोष पणे मुरूम व माळमाफी यांचे हप्ते गोळा करतो याला नेमकं जबाबदार कोण आहे याचे उत्तर अशोक मंदिराज यांनी द्यावा तर बीड जिल्ह्यात पोलीस प्रशासनाचा धाक उरला नाही. पोलीस अधिकाऱ्यावर राजकीय दबाव मोठ्या प्रमाणात अलीकडच्या काळात दिसून येत असल्याने जिल्ह्यात भरदिवसा खून, खून करण्याचा प्रयत्न खंडणीखोर, पतसंस्था घोटाळा, पिक विमा, मटका, गुटखा, वाळू माफिया, भूमाफिया आणि ग्रामध्ये बेजार झालेले जिल्ह्यातील सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांची मानसिकता पाहता नव्याने पदभार घेतलेले पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांच्यापुढे मोठे आव्हान दिसून येत आहे. जिल्ह्यातील अवैध धंदे आणि

**(उर्वरीत पान २ वर)**

| बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –११० | रविवार दि.०५ जानेवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -110 | SUNDAY DT.05 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4 |

## एस पी नवनीत कॉवत साहेब नाईट ड्युटी पोलीसाच्या गाडीत का ?

# खाजगी स्विफ्ट कार मध्ये पेठ पोलीस ठाण्याचे हनुमंत उगले कडून रात्रीस खेळ चाले?



**मुदिराजची उचलबांगडी करणे आवश्यक**






- हनुमंत उगले एकटा किंवा सोबत दुसरा कर्मचारी घेऊन नाईट ड्युटी करतो सर्व पोलीस ठाण्यातील पोलीसाच्या गाडीत व कर्मचाऱ्यांसोबत का करत नाही.?
- पेठ बीड पोलीस ठाण्याचा वादग्रस्त कर्मचारी हनुमंत उगले स्विफ्ट कार मधून नाईट ड्युटी करत मुरूम, वाळूमाफयांची वसुली करतो काल रात्री किती हायवा टिप्पर सोडून दिली चौकशी होणे गरजेचे ?
- एस पी साहेब खाजगी शिफ्टवर पोलीस नाव टाकणे योग्य आहे का त्याचा दुरुपयोग करत पेठ बीड पोलीस ठाण्याचा हनुमंत उगले हप्ते गोळा करतो रात्रीस खेळ चाले? .
- मुरूम वाळू माफीयां सोबत रात्रीच खेळ चाले हनुमंत उगले कडून रात्रीच्या वेळी रस्त्यावरती उभा राहत राजरोस हप्ते वसुली काल रात्री हनुमंत उगले ने किती टिप्पर सोडले याची चौकशी होणे गरजेचे.? हनुमंत उगले ची काल नाईट ड्युटी होते का हे तपासा? हनुमंत उगले पेठ बीड पोलीस ठाण्याचे रात्री आठ ते सकाळी आठ पर्यंत ची नाईट
- ड्युटी स्वतःच्या आलिशान स्विफ्ट कार मधून करतो.? ४ जानेवारी शनिवार रोजी रात्री आठ ते सकाळी आठ पर्यंत नाईट ड्युटीवर हनुमंत उगले होता का तपासणी गरजेचे तर कोणत्या गाडीत नाईट ड्युटी केली.?
- खाजगी शिफ्ट कार व पोलीस नाव टाकून हनुमंत उगले कडून दुरुपयोग पोलीस नावाचा?

### काल रात्री हनुमंत उगले ने स्वतःच्या शिफ्टवर पोलीस ना टाकून पोलीस प्रशासनाचे प्रतिमा मलीन करण्याचे काम केलेले आहे

हनुमंत उगले ने नाईट ड्युटी मध्ये स्वतःच्या आलिशान कार मधून फिरत असताना पोलीस नाव टाकणाऱ्या हनुमंत उगलेला गाडीवर कारवाई पोलीस अधीक्षक करणार का अशोक मुदिराजांनी हनुमंत उगलेला पैसे गोळा करण्यासाठी व गुन्हेगारांचे लाड पुरविण्यासाठी माफीयांना पाठीशी घालण्यासाठी वार्षिक तडतडीसाठी स्वतःचा जवळचा कर्मचारी म्हणून ओळख दिलेली आहे हनुमंत उगले च्या स्विफ्ट कार वरती समोर पोलीस नाव आहे लाल अक्षरात हे नाव टाकण्यास त्याला परवानगी कोणी दिली व हनुमंत उगलेला रात्री अपरात्री नाईट ड्युटी घेऊन अंगावर वरती घालून वाळू माफिया सोबत घोडका राजुरी ते तेलगाव रस्त्यावरती सिगरेट पीत उभारणे चांगले वाटते का व माफीयांना नवनीत कॉवत यांच्या कार्यकाळामध्ये पोसण्याची हिंमत दाखवण्यावर नवनीत कॉवत हे कारवाई करणार का असा सवाल आता जनतेतून होत आहे.

वाळूच्या गाड्या हनुमंत उगले ने पिंपळनेर रोडवरील बायपास पुल ते तेलगाव नाका ते तेलगाव रोडवरील उड्डाणपूल का सोडल्या व कोणाच्या आशीर्वाद सोडल्या?

हनुमंत उगले स्वतःच्या स्विफ्ट गाडीमध्ये फिरून त्यावर पोलीस नाव टाकणं योग्य आहे का हप्ते खोरीसाठी हनुमंत उगले अशोक मुदिराजांनी पाळलेला पोलीस कर्मचारी याला पाठबळ देऊन गुन्हेगार माफीयांना पोसण्याचे काम.?

एस पी साहेब नाईट ड्युटीवर पोलीस कर्मचाऱ्याला खाजगी स्वतःच्या गाडीमध्ये नाईट ड्युटी करणे कोणाच्या आदेशावरून हनुमंत उगले नावाचा पोलीस कर्मचारी हा रात्रीच्या वेळी ऑन ड्युटी ड्रेसवर वरती अंगात घालून रात्री अपरात्री पेठ पोलीस ठाणे हद्दीसह ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये फिरतो तसेच पिंपळनेर नाथापूर काठोडा वांगी शिवनी जरूर मौजवाडी घाटसावळी इकडून येणारा मुरूम माफिया व माजलगावहून येणारी वाळू माफी यांच्या गाड्या का सोडल्या आणि त्या कोणाच्या आशीर्वादाने सोडले हे तपासणी गरजेचे?

नवनीत कॉवत साहेब पेठ बीड पोलीस ठाण्यातील हद्दीमध्ये यांना पोहोचण्यासाठी संबंधित बिटे अमलदार हे सक्रिय आहेत त्यांची अगोदर त्या ठिकाणाहून बदली करा कारण विद्यमान पेठ बीडचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज यांनी मात्र आता नंगानाथाचा कर्ज केला आहे नवनीत कॉवत याच्या कार्य काळामध्ये सर्व पोलीस स्टेशनचे अवैध धंदे बंद असताना पेठ बीडच्या हद्दीमध्ये चालू आहेत दोन नंबरचे धंदे जोरात आणि तेही नवनीत कॉवत साहेब यांच्या रूपाने चांगला अधिकारी बीड करांना नशिबाने भेटला आहे त्यामुळे आता तरी अशोक मीदिराजांनी संबंधित प्रकरणाकडे लक्ष देऊन गांभीर्य घेत बीड जिल्ह्यातील बीडचा माफिया मोकळा आहे. त्याला कुठेतरी आवर घालण्यासाठी नवनीत कॉवत यांच्यासारख्या अधिकारी बीड करांना भेटला म्हणजे बीड करांच चांगलं नशीब मनाव लागेल त्यामुळे पेठ पोलीस ठाणे हद्दीमधील दोन नंबरचे धंदे हे जोरात आजही सुरू आहेत तर काही पोलीस अधिकारी कर्मचारी हे स्वतःच्या खाजगी गाडीमधून रात्रीच्या वेळेस पोलीस ग्रस्त घालत आहेत या गाडीचे डिझेल व भाडे कोण देत असेल असा प्रश्न यावे जनतेला पडला आहे पोलिसांची गाडी सोडून खाजगी गाडीमध्ये रात्रीच्या वेळेस ग्रस्त घालणे योग्य आहे का याचे उत्तर पोलीस निरीक्षक अशोक मंदिरा यांनी देणे गरजेचे आहे. अशोक मंदिराज सह अनेक पोलीस कर्मचारी यांचे पेठ बीड पोलीस ठाण्यातून उचल बांगडी होणे गरजेचे आहे

# ६ जानेवारी : दर्पणदिन ; बाळशास्त्री जांभेकर या उत्तुंग व्यक्तिमत्वास प्रणाम आणि पत्रकार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

मराठी वृत्तपत्राचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठीतील सर्वात पहिले वृत्तपत्र ६ जानेवारी रोजी सुरु केले . त्यामुळे ६ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो . या दिवशी जांभेकर यांचे स्मरण करुन त्यांच्या कार्याचा आढावा घेतला जातो .

बाळशास्त्री जांभेकर हे मुळात अतिशय कुशाग्र , उच्च गुणवत्ता असलेलं व्यक्तिमत्त्व होतं . ब्रिटिशांचे भारतात आगमन झाले , त्यानंतर २९ जानेवारी १७८० रोजी पश्चिम बंगालमध्ये ' बेंगॉल गॅझेट ' नावाचे साप्ताहिक सुरु करण्यात आले . आपले विचार प्रभावीपणे मांडण्यासाठी वृत्तपत्र हे माध्यम अत्यंत प्रभावी आहे , याची जाणीव हळूहळू भारतीयांना होऊ लागली . त्यानंतर बेंगॉल गॅझेटच्या अर्ध्या दशकाने म्हणजेच ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या पहिल्या मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली . जांभेकर यांना दर्पणकार म्हणून ओळखले जाते . ब्रिटिश कालखंडात इंग्रजांच्या विरोधात लिखाण करण्यास मनाई होती . अशा परिस्थितीतही जांभेकर यांनी दर्पणच्या संपादकपदाची धुरा समर्थपणे सांभाळली होती .



दर्पणमध्ये नेमकं काय प्रकाशित होई ?

दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला . त्यावेळी हा अंक मराठी तसेच इंग्रजी अशा दोन्ही भाषेत म्हणजेच जोडभाषेत प्रकाशित केला जायचा . एक इंग्रजी आणि एक मराठी असे दोन स्तंभ या वृत्तपत्रात असत . मराठी जनतेला देशात काय सुरु आहे हे समजावे म्हणून स्तंभ मराठीत लिहिला जायचा . तर वृत्तपत्रात काय लिहिले आहे , हे ब्रिटिशांना समजावे म्हणून दुसरा स्तंभ इंग्रजीत लिहीला जायचा . इंग्रजी सत्तेचे कायम लक्ष असूनही तब्बल साडे आठ वर्षे दर्पण हे वृत्तपत्र चालले .

'दर्पण' या पहिल्या मराठी वृत्तपत्राच्या माध्यमातून देशात मराठी पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणारे बाळशास्त्री जांभेकर मराठी भाषेतील आद्य पत्रकार आहेत . ६ जानेवारी १८१२ ला कोकणात एका सामान्य घरात जन्माला आलेल्या बाळशास्त्री यांचे जीवनमान अवघ्या ३४ वर्षांचे होते . पण त्यांच्या विचारांचा ठेवा , कार्याची पद्धत आणि समाजात प्रबोधन घडवून आणण्यात मोलाचा वाटा आहे . बाळशास्त्री जांभेकर यांचे पहिल मराठी दैनिक ६ जानेवारीला प्रसिद्ध झाल्याने हा दिवस 'मराठी पत्रकार दिन' म्हणून साजरा केला जातो . 'मराठी पत्रकार दिनी' जाणून घेऊयात त्यांच्या आयुष्यातील काही तथ्य !

१९ व्या शतकाच्या सुरूवातीला जेव्हा भारतामध्ये ब्रिटीश राजवटीची सुरूवात झाली होती , तेव्हा त्या काळात बाळशास्त्री जांभेकर हे विद्याविभुषित , पंडीत व्यक्तिमत्त्व काम करत होते.

'बाँबे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या विद्यालयात अभ्यास करून त्यांनी विशीच्या आत कोणाही भारतीयाला तोवर न मिळालेली प्राध्यापक म्हणून नियुक्ती मिळवण्याइतपत ज्ञान कमवले . इ.स. १८३४ साली एल्फिन्स्टन कॉलेजात पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून जांभेकरांची नियुक्ती झाली . जेम्स ऑगस्टस हिकीच्या इंग्रजी 'बेंगॉल गॅझेट' या साप्ताहिकानंतर बाळशास्त्रींनी ५० वर्षांनी दर्पण हे पहिलं मराठी वृत्तपत्र सुरू केल . दर्पण ६ जानेवारी १८३२ ला प्रसिद्ध झाला आणि अवघ्या २० वर्षांच्या पण पंडीत असणार्या बाळशास्त्री जांभेकरांनी संपादकपदाची धुरा सांभाळली .जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख आणि ताम्रपट यांच्यावर शोधनिबंध लिहिले . मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली .ाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांचे प्रबोधन केले . समाजातील वर्ण व्यवस्था , जातीभेद , स्त्री दास्य , सती , अस्पृश्यता , बालविवाह यांवर त्यांनी दर्पणच्या माध्यमातून लिखाण केल्याने त्यांना आद्य समाजसुधारकही म्हटलं जाऊ लागले .बाळशास्त्रींना मराठी , संस्कृत , बंगाली , गुजराती , कानडी , तेलुगू , फारसी , फ्रेंच , लॅटिन आणि ग्रीक या दहा भाषांचे ज्ञान होते . भाषांसोबतच विज्ञान , गणित , भूगोल , शरीरशास्त्र आणि सामान्य ज्ञान या विषयांचीही चांगली जाण होती .

बाळशास्त्री जांभेकर म्हणजे बहुआयामी, बहुभाषिक आणि उत्तुंग व्यक्तिमत्त्व . बाळशास्त्री जांभेकर यांनी महाराष्ट्राला पहिले वृत्तपत्र देऊन वैचारिक अभिसरणाची पेरणी केली . त्यांच्यानंतर वृत्तपत्र हे वैचारिक क्रांतीचे महत्त्वाचे साधन बनले . जांभेकर हे एक अतिशय हुशार आणि बहुआयामी व्यक्तिमत्व होते . त्यांना संस्कृत , मराठी , इंग्रजी आणि हिंदी या भाषा चांगल्या अवगत होत्या . शिवाय ग्रीक , लॅटिन , फ्रेंच , बंगाली आणि गुजराती या भाषांवरही त्यांचे प्रभुत्त्व होते . भूगोल , विज्ञान , गणित अशा विषयात ते पारंगत होते . रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले ते पहिले भारतीय आहेत . बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले . अशा या उत्तुंग व्यक्तिमत्त्वास मनापासून प्रणाम .

चला या निमित्ताने पत्रकारिता म्हणजे काय ते जाणून घेऊ :वृत्तपत्रकारिता : वृत्तपत्राच्या किंवा नभोवाणी वा दुरचित्रवाणी यासारख्या जनसंज्ञापनांच्या माध्यमातून वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या वृत्तविषयक गरजा भागवण्याचे कार्य म्हणजे 'वृत्तपत्रकारिता' असे म्हणता येईल .

लोकशाही राज्यव्यवस्थेची इमारत कायदेमंडळ , राज्यशासन , न्यायसंस्था व पत्रकारिता या चार आधारस्तंभावर उभी असते . ही कल्पना प्रथम मेकॉलेने १८२८ मध्ये आपल्या 'कॉन्स्टिट्यूशनल हिस्टरी' या निबंधात मांडली . वृत्तपत्रांच्या संदर्भात त्याने 'चौथी शक्ती' असा शब्दप्रयोग केला होता . पत्रकारितेची मुख्यत: तीन कार्ये असतात : माहिती देणे , उदबोधन करणे आणि मनोरंजन . ही कार्ये चांगल्या रितीने पार पाडता यावीत म्हणून वृत्तपत्रे व पत्रकार यांना स्वातंत्र्याची आवश्यकता असते . निर्मितिखर्चापेक्षा कमी किंमतीला विकली जाणारी एकमेव वस्तू म्हणजे वृत्तपत्र होय . वृत्तपत्राच्या विक्रीतून कागदाचा खर्च जेमतेम भरून निघतो . वृत्तपत्रांना आपले सर्व प्रकारचे खर्च जाहिरांतीच्या उत्पन्नातून भागावावे लागतात आणि आवश्यक असा फायदा कमवावा लागतो .

पत्रकारितेचे विविध प्रकार : पत्रकारितेची उद्दिष्टे , स्वरूप , कार्य यांनुसार विविध प्रकार संभवतात . विकास पत्रकारिता , शोध पत्रकारिता , अन्वयार्थक पत्रकारिता , नवपत्रकारिता हे त्यांतील काही प्रमुख प्रकार होत .

वृत्तपत्र - कार्यालय : वृत्तपत्र संस्थेचे तीन प्रमुख घटक असतात . (१) अधिकारांची रचना (२) मालक/संचालक मंडळ/ विश्वस्त मंडळ , (३) वृत्तपत्र कार्यालयातील विविध विभाग . वृत्तपत्रव्यवसायातील गरजानुसार वृत्तपत्र कार्यालयाचे सर्वसाधारणपणे पुढीलप्रमाणे विभाग असतात : (१) संपादन विभाग , (२) मुद्रण विभाग, (३ ) वितरण विभाग, (४ ) जाहिरात विभाग , (५) प्रशासन विभाग . दररोज सकाळी नियोजित वेळापत्रकाप्रमाणे वृत्तपत्र कचेरीचे काम सुरु होते . या दृष्टीने संपादकाची सकाळची बैठक ही महत्त्वाची असते . या बैठकीला वृत्तसंपादक , वृत्तकक्ष प्रमुख , मुख्य वार्ताहर , सहसंपादक तसे गरजेप्रमाणे इतर संपादक उपस्थित असतात . आदल्या दिवसाच्या कामाची या बैठकीत तपासणी होते . इतर वृत्तपत्रांच्या तुलनेत आपण कोठे मागे पडलो वा कोठे आघाडी मारली याची कसून छाननी होते . आज घडणाऱ्या संभाव्य गोष्टींची चर्चा होते व त्या आधारावर आजच्या कामाचे नियोजन सुरु होते . याच माहितीच्या आधारे सहसंपादकांच्या बैठकीमध्ये संभाव्य अग्रलेख-विषयांची चर्चा होते . पुढील काही दिवसांसाठी कोणाचे व कोणते लेख मागवावे लागतील याचे , तसेच सदरांचे नियोजन होते .

वृत्तपत्राचे पहिले पान व सर्वसाधारण बातम्यांची काही पाने तयार करणाऱ्या रात्रीच्या मुख्य उपसंपादकाचे काम अत्यंत महत्त्वाचे असते व पूर्वी त्यास त्या दिवशीच्या वृत्तपत्राचा 'शिल्पकार' समजले जाई . त्याच्या कौशल्यावरच त्या दिवशीच्या वृत्तपत्राची विश्वासार्हता , गुणवत्ता व आकर्षकता अवलंबून असते . या कामात त्याला वेळोवेळी आपल्या वरिष्ठांचा दूरध्वनीवरुन सल्ला मिळत असतोच . अचानक महत्त्वाची बातमी आल्यास छपाई थांबवून तिचा समावेश करण्याचाही त्यास अधिकार असतो .

बातम्यांचे संपादन : वृत्तपत्र-कचेरीत वृत्तसंस्थांकडून , परगावच्या आणि शहरातील वार्ताहरांकडून , तसेच इतर मार्गांनी दूरमुद्रक , दूरध्वनी , तारा , फॅक्स , निवेदन आदी माध्यमांद्वारे घटनांचे वृत्तांत येत असतात . वृत्तपत्राच्या आकारानुसार त्यातील आवश्यक आणि योग्य बातम्यांची निवड मुख्य उपसंपादक करतात . वृत्तपत्र प्रादेशिक भाषेत असेल , तर बातम्यांचे भाषांतर करावे लागते . तसेच वार्ताहराने दिलेल्या वृत्तांताचे पुनर्लेखन , संपादन आदी संस्कार करावे लागतात .

पत्रकारितेची भाषा : वृत्तपत्रात लिहिली जाणारी भाषा ग्रांथिक भाषेपेक्षा आणि बोली भाषेपेक्षा भिन्न असते . सर्वांना समजेल अशी भाषा वृत्तपत्रांना योजावी लागते , ती व्यक्तीची भाषा नसून वृत्तपत्र या संस्थेची भाषा आहे , तिच्यात शैलीच्या व्यक्तिगत वैशिष्ट्यांना वाव नसतो .

पत्रकारिताविषयक संस्था : भारतात पत्रकारितेशी संबंधित अशा काही शासकीय आणि अशासकीय संस्था महत्त्वाचे कार्य करीत आहेत . त्या पुढीलप्रमाणे : भारताचे वृत्तपत्र निबंधक : ( रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर फॉर इंडिया ) ही संस्था १जुलै १९५६ रोजी अस्तित्वात आली . कायद्याने ठरवून दिलेल्या आपल्या कर्तव्यांखेरीज मुद्रणासाठी लागणारी यंत्रसामग्री आणि वृत्तपत्रांना लागणारी इतर सामग्री यांच्या आयातीबद्दल शिफारशी करण्याचे कामही निबंधक करतात . प्रेस इंफर्मेशन ब्यूरो : मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांना सरकारची धोरणे , कार्यक्रम , पुढाकार आणि कामगिरी यांबद्दल माहिती देण्यासाठी ही संस्था अस्तित्वात आली . वृत्तपत्रे आणि इतर माध्यमांमधून व्यक्त झालेले जनमत सरकारपर्यंत पोहोचविणे , म्हणजेच सरकारी कार्यक्रमांना लोकांकडून मिळणारा प्रतिसाद सरकारकडे पोहोचविणे हे काम ही संस्था करते . पत्रसूचना कार्यालयाची ( पीआयबी) आठ क्षेत्रीय कार्यालये असून ३२ ठिकाणी शाखा कार्यालये व माहिती केंद्रे आहेत . इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन : जनसंज्ञापनाच्या विविध क्षेत्रांमध्ये विशेष अभ्यास , संशोधन आणि प्रशिक्षण ही कामे करण्यासाठी या संस्थेची स्थापना १९६५ मध्ये झाली . ही एक स्वायत्त संस्था असून तिला भारत सरकारच्या माहिती व प्रसारण खात्याकडून निधी उपलब्ध होतो . ही संस्था शिक्षण व प्रशिक्षणाचे कार्यक्रम चालविते , चर्चासत्रे आयोजित करते आणि देशाला आवश्यक असलेले पायाभूय माहितीविषयक व्यवस्थापन निर्माण करण्यास साहाय्य करते . प्रेस इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया : या संस्थेची स्थापना १९६३ मध्ये भारतातील वृत्तपत्रांनी एकत्र येऊन केली . पत्रकारितेच्या उच्च आणि जबाबदारीच्या कसोट्यांना भारतीय वृत्तपत्रांना उतरता यावे , हा तिच्या स्थापनेमागील मुख्य हेतू होता . आशियातील अशा प्रकारची ही पहिलीच संस्था होय .

वृत्तपत्रकारिता आणि महाजाल (इंटरनेट) : भारतात १९९५ नंतर जागतिक संगणकीय महाजालातील पत्रकारिता अस्तित्वात आली . विसाव्या शतकाच्या सातव्या दशकात लष्करी उपयोगासाठी महाजालाच्या प्राथमिक रूपाचा वापर अमेरिकेत सुरू झाला. १९८४ मध्ये अमेरिकेतील शिक्षण व संशोधनसंस्थांना ते खुले झाले. १९९० पासून त्याचा जागतिक विस्तार सुरू झाला . इंटरनेट मुळे काही बाबी सुकरही झाल्या .

एकंदरीतच वृत्तपत्रकारिता वाटते तितकी सोपी नाही . त्यातच वार्ताहरांसमोर अनेक समस्या असतात . यातून मार्ग काढत जगभराची माहिती उपलब्ध करुन देण्याचे काम मीडिया देत असतो . या पत्रकार दिनी सर्व पत्रकार बांधव भगिनींना मन:पूर्वक शुभेच्छा !



चंद्रकांत शेळके , तहसीलदार , बीड

## बीड जिल्ह्यात ऊसतोड मजुरांच्या बैलांच्या अपघातांची मालिका: ऊसतोड

## कामगार मेहनतीवर मोठा आघात

धारुर / प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात मागील आठवड्यात बैलांच्या अपघाताच्या दोन गंभीर घटना घडल्या आहेत. कळूचीवाडी येथील श्रीराम बिक्कड यांच्या बैलाचे कर्नाटकातील अतानी सुगर लिमिटेड येथे अपघाती निधन झाले, तर जायभायवाडी येथील राधाकिशन राजाराम कराड यांची गाडी उसाच्या फडात चिखलात फसली असताना ती बाहेर काढताना अपघात झाला. यात यांच्या बैलास जबर मार लागल्यामुळे दोन शिंगे व पाय निकामी झाले. बैल अपंग झाला आहे.



या दुर्दैवी घटनांनी ऊसतोड मजुरांच्या मेहनतीवर मोठा आघात केला आहे. ऊसतोड मजुरांनी आपल्या बैलांसाठी विमा उतरवणे किती आवश्यक आहे, हे या घटनांमधून अधोरेखित झाले आहे. अशा घटना टाळण्यासाठी योग्य खबरदारी घेण्याची गरज आहे.

युवा ग्राम विकास मंडळ संस्थे अंतर्गत नेहमी ऊसतोड मजुरांना ऊसतोडनी करायला जाण्याअगोदर आपला कुटुंबाचा व पशूंचां विमा उतरण्यासाठी आवाहन करून महत्त्व सांगितले जाते.

अशा घटना घडल्यास ऊसतोड मजुरांनी आपल्या बैलाचा रीतसर पंचनामा करून घ्यावा व आवश्यक त्या कागदपत्रांसह सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत शासन निर्णय १० ऑक्टोंबर २०२४ गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ सानुग्रह अनुदान योजनेअंतर्गत अर्ज करावा. या अंतर्गत ऊसतोड मजुरास आपल्या झालेल्या नुकसानीची काही प्रमाणात भरपाई मिळू शकते. अशी माहिती युवा ग्राम विकास मंडळ संस्थेचे प्रशासनिक संतोष रेपे यांनी दिली

## १ जानेवारी २०२५ भीमा कोरेगाव. (! पुणे ) (शौर्य दिन) विजयस्तंभ मानवंदना

यश सिध्दीआजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फर असोसिएशन ,महाराष्ट्र राज्य (महार रेजिमेंट संघटना ) व शाक्य संघ , सेवानिवृत्त पोलीस बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य केंद्रीय कार्यालय,नागपूर (नियोजित ) यांनी संयुक्तरित्या भीमा कोरेगाव ( शौर्य दिन ) विजय स्तंभास मानवंदना देण्यात आली.

सदर मानवंदना करता प्रथमच शाक्य संघ महाराष्ट्र राज्य या बॅनर खाली बीड, सोलापूर ,लातूर , अमरावती ,नागपूर जालना येथील शाक्य संघ मधील सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते. भीमा कोरेगाव या गावात रॅली काढून जयभीम चा नारा देऊन व ५०० शुर महारांचा विजय असो , संविधानाचा विजय असो नियोजित शाक्य संघ, . सेवानिवृत्त पोलीस बहुउद्देशीय संघटना महाराष्ट्र राज्य विजय असो , यशसिद्धी सेवानिवृत्त आजी-माजी सैनिकाचे संघटना महाराष्ट्र राज्य यांचा विजय



असो. अशा अशा घोषणा देऊन परिसर , दणाणून सोडला होता. सदर रॅलीमध्ये सुमारे १००० बौद्ध उपासक व उपासिका हजर होत्या.यशसिद्धी आजी-माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यक्रमात श्री. अशोककुमार दिलपाक व अशोक ठोकळ यांनी भीमा कोरेगाव शौर्य दिन याबाबत आपले मनोगत करून त्या निमित्ताने सर्वांना शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमाकरिता श्री अमितेश कुमार ( पोलीस आयुक्त पुणे शहर ) मनोज. पाटील ( अपर पोलीस आयुक्त ) , रंजन कुमार शर्मा ( पोलीस सह आयुक्त ) ,बाबू पोळके ( सेवानिवृत्त कॅप्टन ) , वसंत मस्के ( राज्यअध्यक्ष), शिवपुत्र घटकांबळे, शाक्य संघ सेवानिवृत्त पोलिस अधिकारी व कर्मचारी संघ, बीडचे आयु.अशोक ठोकळ, आयु. सुरेश साबळे, आयु.कल्याण भंडारे, आयु. सोनाजी शिंदे, आयु. तानाजी शिनगारे, आयु, श्रीपती मस्के, आयु.आबा चक्रे, आयु. गौतम जाधव, आयु.अनिल बोराडे

आयु.बाबासाहेब घोडके, आयु.चंद्रकला साळवे, आयु.रत्नप्रभा भंडारे, आयु. उर्मिलाताई मस्के, विद्याताई साबळे, आयु.राजश्री घोडके. आयु. लताबाई चक्रे, आयु. संगिताताई शिंदे, आशाताई शिनगारे, आयु ललीताताई ससाणे, तसेच अशोककुमार दिलपाक , सुनिता दिलपाक ( सोलापूर. ) रत्नाकर मेश्राम, दादाराव वानखेडे ( नागपूर. ),उदय रंगारी, प्रमोद मेश्राम ( अमरावती. )शाहूराज कांबळे ( लातूर. ) वगैरे हजर होते.

पान १ वरून..

**खाजगी स्विफ्ट कार मध्ये...**

गुंडाराज संपविण्यासाठी प्रथम कोणते काम करायचे असेल तर पेठ बीड पोलीस ठाण्याचे पीआय अशोक मुदिराज स्थानिक गुन्हे शाखा, विशेष पथक, आर्थिक गुन्हे शाखेसह सर्व पोलीस निरीक्षक, सपोनिसह अनेक पोलीस कर्मचारी यांची अदला बदल करणे अत्यंत महत्वाचे आहे. कारण यामध्ये अनेकजण राजकीय पुढाऱ्यांच्या शिफारशीवर पदभार घेतलेले दिसून येत आहेत. त्यामुळे जोपर्यंत या अधिकाऱ्यांमध्ये अदला बदल केली जात नाही. तोपर्यंत जिल्ह्यातला गुन्ह्यातला जास्तीचा आलेख कमी होणार नाही.

वाळू मुरूम माफिया चैनल. आयवा खून दरोडे बलात्कार अनेक प्रकरणामुळे

महाराष्ट्राच्याच वेशीवर नव्हे तर देशाच्या वेशीवर बीड जिल्ह्याच्या गुन्ह्यांची लक्तरे वेशीवर टांगली जाऊ लागली आहेत. जो तो बीड जिल्ह्यातील गुन्ह्यांची आणि राजकीय नेत्यांबर आरोप प्रत्यारोप करत आपले तोंडसुख घेत आहेत. त्याचे कारणही तेवढेच आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरण असो की बीड जिल्हात अनेक खोटे गुन्हे, त्याचबरोबर जीवघेणा हल्ला, गुटखा, मटका वाळू, राख माफिन्यांचा हैदोस, गुन्हेगार उघड माध्याने फिरत असताना पोलीसांवर राजकीय दबावामुळे या गुन्हेगारांना अटकाव करता येत नाही. त्यामुळे गुंडाराज निमर्माण झाले आहे. एवढेच नव्हे तर ज्या जिल्हा प्रशासनाच्या हातातून बंदुका देण्यात आल्या. त्या बंदुका बाळगणारा तो त्यासाठी समर्थ आहे का? याची पोलीस अधिक्षकांनी चौकशी करावी, त्याचबरोबर जिल्ह्यामध्ये ज्या ठिकाणी

पान १ वरून..

राजकीय पुढाऱ्यांच्या शिफारशीनुसार पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतलेल्या अधिकाऱ्यांना तातडीने त्या ठिकाणाहून बदलून त्या ठिकाणी दुसरे अधिकारी नियुक्त करणे, त्याचबरोबर जिल्ह्यातील भरदिवसा खून पतसंस्था घोटाळा पिकविमा पोलीस अधिकारी, कर्मचारी रात्री अपरात्री ज्या ठिकाणी अवैध वाळू, मुरूम, नराख, उपसा करून वाहतूक केली जाते. त्या ठिकाणी हे जाऊन कारय करतात याची खातरजमा करावी. त्याचबरोबर वाळूमाफिया पोलिसांवर राजकीय दबाय जिल्ह्यामध्ये अनेक गुन्हेगार उघड माध्याने फिरत आहेत, त्यांच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई करून जिल्हाबंदी कराठी, त्याचबरोबर विशेष पथक बरखास्त करून थेट एक वेगळे पथक निर्माण करून त्या खंडणीखोर गुंडाराज पथकाचा अधिकारी, कर्मचाऱ्याचे मोबाईल, पोलीस अधिक्षकांना जोडलेले असावे, आणि जाण्या अगोदर प कारवाईच्या वेळी पोलीस अधिक्षकांना सांगून आणि त्यांची सूचना घेतल्याशिवाय कोणतेही पाऊल उचलू, नये, कारण जिल्ह्यात असे अनेक पथके असून हे पथक कोणाच्या सुचनाचे पालन न करता रात्री अपरात्री कुठेही जाऊन कारवाई करण्याचे केवळ तोंड दाखवतात, मात्र कारवाई करत नाहीत. विशेष करून रिथानिक गुन्हे शाखेचा अधिकारी हा थेट अप्पर पोलिस अधिक्षक यांच्याशी थेट जोडणारा असावा आणि त्यांच्या देखरेखीखाली दिवसभराचे किंवा २४ तासाचे कामकाज करावे, असे बदल अपेक्षित आहेत, मात्र सर्यात बदल मोठा म्हणजे अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि विशेष करून जे अधिकारी, अचानक बाहेर जिल्ह्यातून

पान १ वरून..

थेट तालुक्याला नियुक्त्या करून घेतल्या त्यांच्या संदर्भात पोलीस अधिक्षकांनी पाऊले उचलावीत, विशेष करून कुक्कडगाव नाथापूर राक्षस भवन वाळू पट्टे असलेले व पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीतील हद्दीतून येणाऱ्या वाळू माफियांना हनुमंत उगले नावाचा पोलीस कर्मचारी हा खंडेश्वरी रोड ते पिंपळनेर तेलगाव नाका या ठिकाणी आपला संपर्क रस्त्यावर उभा राहून सिगरेट पितो व त्यांच्याशी संपर्क करतो तर माजलगाव येथून येणारा वाळू माफिया व तेलगाव रोडवरील येताना ढेकण व घाटसावळी मौजवाडी जरूर शिवणे काठोडा या गावावरती डोंगराची मोठे प्रमाणात रांग आहेत या डोंगरावर ती मुरूम खोदून येणाऱ्या मुरूम माफी यांना सुद्धा हनुमंत उगले पाठीशी घालत आहे त्यांनी काल रात्री सुद्धा अशाच काही प्रकार केला आहे तेलगाव नाका ते मोची पिंपळगाव उड्डाणपूला जवळ अनेक टिपऱ्यांना का सोडून दिले याचा जाब त्याला विचारा व तो खाजगी गाडीमधून का फिरला याचा त्याला विचारा कारण त्याला विचारणारा कोणीच राहिलेला नाही नवनीत का वत त्यांनी त्याच्यावरती कारवाई करतील अशी अपेक्षा आता या ठिकाणी जनतेला त्यांच्याकडून आहे पेठ बीड पोलीस ठाण्यात सह अनेक पोलीस ठाण्यातील बीड जिल्ह्यातील अधिकारी कर्मचाऱ्यांचे खांदे पाण्यात होणे गरजेचे आहे ारण भेटकार्यांना चांगला एस पी दिवसांनी नशिबाने भेटला आहे बीड मधील गुन्हेगारी रोखण्यासाठी नवनीत कावस साहेब यांनी विडा उचललेला आहे आणि तो यशस्वी ही होत आहे त्यामुळे नवनीत कावत यांच्यासारखे अधिकाऱ्याच्या पाठीशी

# एक दिवस गेवराई तालुक्याचा विद्यार्थी खेळाडू देश पातळीवर खेळेल- रणवीर पंडित

## दिमाखदार सोहळ्यात गेवराई येथील चौथ्या क्रीडा महोत्सवाचे भव्य उद्घाटन

गेवराई (प्रतिनिधी) गेवराई तालुक्याच्या ग्रामीण भागातील विद्यार्थी खेळाडूना क्रीडा क्षेत्रामध्ये नाव कमावण्यासाठी माजी मंत्री आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी व जगदंबा शिक्षण संस्थेच्या अंतर्गत क्रीडा महोत्सवाचे गेल्या तीन वर्षापासून आयोजन करण्यात येत आहे. क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून तालुक्याच्या ग्रामीण भागातील खेळाडू राज्य पातळीवर गेले असून एक दिवस गेवराई तालुक्यातील मुलगी किंवा मुलगा देश पातळीवर खेळेल आणि या तालुक्याचा नाव लौकिक होईल असा विश्वास शारदा स्पोर्ट्स अकादमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी व्यक्त केला. जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत चौथ्या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

शारदा स्पोर्ट् कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या संकल्पनेतून जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत चौथ्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन गेवराई येथील शारदा विद्या मंदिराच्या भव्य मैदानावर रविवार दिनांक ०५ जानेवारी रोजी करण्यात आले. या वेळी दै. रिपोर्टर चे



कार्यकारी संपादक गणेश सावंत,

दै. सकाळचे जिल्हा प्रतिनिधी दत्तात्रय देशमुख, राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे तालुकाध्यक्ष खालेदभाई कुरेशी, नगरसेवक शाम येवले, जेष्ठ विधिज्ञ स्वप्नील येवले, सय्यद खाजा मामू, दत्तात्रय दाभाडे, सरपंच विष्णुपंत घोंगडे, संदीप मडके, अक्षय पवार, किरण दाभाडे, राम म्हेत्रे, बाळासाहेब दाभाडे, अप्पासाहेब परळकर, शेख मोहसीन यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रारंभी दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. स्काउट- गाईड पथक, भारतीयम पथक, सांस्कृतिक पथकाच्या विद्यार्थ्यांनी संचलन करून मानवंदना दिली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते मैदान पूजन आणि खेळाडूचा परीचय करून सामान्यांना प्रारंभ झाला. शुभारंभाचा सामना शारदा विद्या मंदिर बीड विरुद्ध माध्यमिक विद्यालय सिरसदेवी आणि दुसरा सामना माध्यमिक विद्यालय खालेगाव विरुद्ध माध्यमिक विद्यालय मारफळा यांचं दरम्यान झाला. यावेळी बुद्धीबळ स्पर्धांचाही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

क्रीडा महोत्सवामध्ये बुद्धिबळ स्पर्धेचा शुभारंभ यावेळी करण्यात आले. या स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शारदा विद्या मंदि च्या भव्य मैदानावर मुलींच्या गटामध्ये कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या. चार मैदानावर या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. कबड्डी स्पर्धेचे पंच म्हणून शुभम कादे, सिद्धू माने, रवींद्र राठोड, आकाश राठोड, गणेश यादव, ज्ञानेश्वर कापसे, प्रेम पवार, डॉ. प्रवीण शिलेदार यांनी काम पहिले.

या कार्यक्रमात राज्य पातळीवर खेळलेल्या विद्यार्थी खेळाडू कोमल जाधव, गीता जाधव, आर्या पाटील, दिव्या राठोड ,श्रद्धा दाभाड आदींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासन अधिकारी प्रमोद गोरकर, प्रा. गोगुले काशिनाथ, मुख्याध्यापक राजेंद्र जगदाळे, मुरलीधर पवार, अशोक तौर, भक्तराज पौळ, वसंत राठोड, रणजीत सानप, उदय पाठक, सय्यद युनुस, भागवत राऊत, बबन पवार, विश्वनाथ पवार यांच्यासह शिक्षण संस्थेतील सर्व शाळेचे मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, क्रीडाप्रेमी नागरिक, विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संखेने उपस्थित होते.



# अंभोरा पोलिसांची सावरगाव,नांदूर हॉटेल वर धाड

## १४,३५० रुपयांचा अवैध दारू साठा जप्त

आष्टी /प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ठाणेदारांना दिलेल्या आदेशानुसार अंभोरा पोलिसांनी अवैध धंदे विरोधात धाडसत्र सुरू केले आहे शुक्रवारी नांदूर विठ्ठलाचे ,सावरगाव ,येथील हॉटेलवर छापा मारून देशी-विदेशी दारू पकडले आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलीस स्टेशन हद्दीत कायदा व व्यवस्था अबाधित राहण्यासाठी धाडसत्र सुरू आहे या दोन हॉटेलवर टाकलेल्या गाडीत १४ हजार तीनशे पन्नास रुपयाची देशी-विदेशी दारू साठा जप्त करण्यात आला ही कारवाई अंभोरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संतोष क्षीरसागर, दताळ , लुईस पवार, दत्तात्रय टकले, पोलीस शिपाई पडवळ यांनी केली आहे

नागरिकांना आव्हान

नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की आपल्या परिसरात कुठे अवैधरीत्या मटका ,दारू ,ताडी, पत्तेचे क्लब असे अवैध धंदे चालु असल्यास नागरिकांनी आम्हाला परिसरातील अवैध धंद्याची माहिती द्यावी आपले नाव गोपनीय ठेवण्यात येईल व अवैध धंद्यावर कठोर कारवाई करण्यात येईल

सपोनि मंगेश साळवे अंभोरा

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली-स्वाती गाडेकर,सविता माने

आष्टी (प्रतिनिधी)

स्वातंत्र्यपूर्व काळात महिला चूल आणि मूल या संकल्पनेत असताना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून स्त्री शिक्षणासाठी पुढाकार घेतला.समाजाचा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी शिक्षणाची गरज असल्याचे ओळखून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली असे प्रतिपादन आदर्श शिक्षिका स्वाती गाडेकर व मुख्याध्यापिका सौ. सविता माने यांनी केले. आष्टी शहरातील स्व.अनिलभैय्या निकाळजे नगरात महिला मंडळाच्यावतीने महान स्त्री समाज सुधारक,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने आष्टीत बालिका दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होत्या.

सौ.गाडेकर वा सौ. माने पुढे म्हणाल्या की,फुले दाम्पत्याने शिक्षणाचे महत्त्व समाजाला पटवून दिले.शिक्षणाचा प्रचार आणी प्रसार केला मात्र आज शिक्षण घेण्याचा हेतू बदलला आहे. शिक्षणाकडे फक्त नोकरी मिळवण्याचे साधन म्हणून पाहिले जात आहे हे चुकीचे आहे. शिक्षणातुन आदर्श माणुस घडला पाहिजे असे सांगत स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या म्हणून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले

यांच्याकडे पाहिले जाते.त्याकाळात स्त्रियांना शिक्षण मिळणे दुरास्पत होते अशा काळात सावित्रीबाईंनी स्त्रियांना शिक्षणाची दारे खुले केली.त्यामुळे बदलत्या काळानुरुप स्त्रियांनी शिक्षण घेऊन आज विविध क्षेत्रात आपल्या कार्य कर्तुत्वाने भरारी घेतली आहे असे आदर्श शिक्षिका स्वाती गाडेकर व मुख्याध्यापिका सौ.सविता माने म्हणाल्या. यावेळी शिक्षिका सौ.बबिता बोडखे म्हणल्या की, महात्मा फुले चिकित्सक वृत्तीचे होते.त्यांनी इतिहासाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन निर्माण केला.त्याच्या खांद्याला खांदा देऊन सावित्रीबाई फुले लढल्या. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंना अतिशय वाईट वागणूक सहन करावी लागली. फुले दाम्पत्याने विषमतावादी,वाईट रूढी,परंपरांना नष्ट करुन समतेच बीज रोवलं आहे.स्त्रियांच्या जीवनात नवी शिक्षणाच्या माध्यमातून क्रांती घडवण्याचे अमूल्य कार्य क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांनी केले.चूल आणि मुल या जुनाट विचारसरणीला तिलांजली देत समता आणि बंधुत्वाची



नवी पहाट निर्माण करणाऱ्या सावित्रीबाई फुले या महिलांच्या शिक्षण क्षेत्रातील 'हिरकणी' होत्या! असा गौरव केला.यावेळी क-हेवाडी येथील हरिनारायण स्वामी विद्यालयाच्या रोशनी सांगळे,प्रिती सांगळे,सिध्दी बन्सोडे, खुशी कोथंबीरे,अंकीता म्हस्के,भुमी वडमारे या विद्यार्थीनीसह शृंगेरी विद्यालायाच्या मुख्याध्यापिका सविता माने,सौ.

आशा रासकर,सौ.स्वाती गाडेकर, आशा कोथंबीरे,सौ.स्वप्नाली दत्ता बोडखे,श्रीमती ढवळे मडम,वर्षा शिंदे,सौ. अश्विनी तांबे,सौ.पोर्णिमा निकाळजे यांची समयोजीत भाषणे झाले.यावेळी श्रीमती ढवळे

गर्भातच अंत करु नका सावित्रीचा ही कविता सादर करुन उपस्थितांचे मने जिंकले. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी अत्यंत अभ्यासपूर्वक भाषणे करून उपस्थितांची वाहवा मिळवली.या शालेय विद्यार्थ्यांनीच्या भाषणाला भरभरून प्रतिसाद मिळाला.

बोलताना सौ.पोर्णिमा निकाळजे बोलताना म्हणाल्या की, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्र कार्यातील स्त्रियांसाठी घेतलेले त्यांनी परिश्रम आणि त्यामुळे स्त्रियांच्या जीवनात आलेली सकारात्मक परिवर्तनाची क्रांती या अनुषंगाने विविध उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले.या कार्यक्रमास आष्टी पंचायत समितीच्या माजी सदस्या सौ.प्रज्ञा निकाळजे,सौ. सांगीता शाहीर,सौ. नम्रता सोनवणे,सौ.वैशाली लोंढे, सौ.सुनिता सोनवणे,सौ.शितल निकाळजे,सौ.माधुरी वडमारे,सौ. मोनाली कदम,सौ.सुनिता जगताप, सौ.मनिषा सायांबर,सौ.पल्लवी संदीप चौधरी,सौ.अलका चौधरी, सौ.ज्योती धोंडे,सौ.सुनिता संपतराव धोंडे,सौ. राजेश्वरी धोंडे, सौ. ताराबाई एकनाथ धोंडे,सौ. पुनम धोंडे,जनाबाई धोंडे,सौ. खंडागळे,सौ.संगीता खंडागळे,नंदीनी निकाळजे,सोनवणेबाई आदि महिला,विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे नियोजन सौ.पोर्णिमा मिलींद निकाळजे, श्रीमती सविता ढवळे, सौ.बबीता बोडखे यांनी केले. कार्यक्रमचे संचलन सौ.बबीता बोडखे यांनी तरा उपस्थितांचे आभार सौ.पोर्णिमा निकाळजे यांनी मानले.

# डॉ.राजेश इंगोले यांना आयएमएचा 'राष्ट्रीय पुरस्कार'

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

इंडीयन मेडीकल असोसिएशनचे महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक समिती अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांना इंडीयन मेडीकल असोसिएशनच्या 'नॅशनल प्रेसिडेंटस ऍप्रेसिएशन अवॉर्ड फॉर बेस्ट कल्चरल ऍक्टिव्हिटी' या अत्यंत सन्मानाचा राष्ट्रीय पुरस्कार नुकताच प्रदान झाला. महाराष्ट्रात आजपर्यंत हा पुरस्कार फक्त डॉ.राजेश इंगोले यांनाच मिळाला हा पुरस्कार हैद्राबाद येथे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. टी असोकन, राष्ट्रीय सचिव डॉ.अनिलकुमार जे.नायक तसेच नूतन अध्यक्ष जगप्रसिद्ध एआई हॉस्पिटलचे सचालक डॉ दिलीप भानुशाली यांच्या हस्ते दिनांक २७ डिसेंबर रोजी प्रदान करण्यात आला. डॉ. इंगोले यांनी

महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्ससाठी एक सशक्त व्यासपीठ निर्माण करून वैद्यकीय क्षेत्रातही सांस्कृतिक चळवळ गतिमान केली.

हा पुरस्कार मिळाल्याबद्दल महाराष्ट्र राज्य अध्यक्ष डॉ.संतोष कदम, सचिव डॉ.अनिल आव्हाड, माजी राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.रवी वानखेडकर, डॉ.जयेश लेले, डॉ.अनिल पाचनेकर, डॉ.सुहास पिंगळे, माजी राज्याध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे, माजी राज्यसचिव डॉ.सौरभ संजनवाला माजी अध्यक्ष डॉ.रवींद्र कुटे, डॉ.रामकृष्ण लोंढे, नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ.संजय पाटील,डॉ संजय कदम, डॉ.रंजन संचेती, डॉ.मीनाक्षी कुलकर्णी,डॉ राजू




इंगळे, डॉ.स्नेहलता पटवर्धन, डॉ.राजीव जेथलिया,डॉ.सिद्धेश्वर बिराजदार, डॉ.विजय लाड, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.योगेश मुळे,डॉ अरुणा केंद्रे, डॉ नितीन पोतदार, डॉ नितीन चाटे, डॉ स्नेहल होळंबे, डॉ ऐश्वर्या चव्हाण, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.श्रीनिवास रेड्डी यांच्यासह जेष्ठ मार्गदर्शक डॉ.सुधीर देशमुख, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.एन.पी.देशपांडे, डॉ.उत्तम निसाले, डॉ.शैलेश वैद्य आयएमएचे सांस्कृतीक समिती सदस्य डॉ.गितांजली शर्मा, डॉ.तुकाराम मुंढे, डॉ.मोहिनी गानू, डॉ.वृंदा कुलकर्णी,डॉ.राजश्री सावंत, डॉ.माया भालेराव, डॉ.प्रज्ञा किनगावकर, डॉ.प्रफुल्ल जटाळे, डॉ.राजन जोशी, डॉ.वैष्णवी पाटील, डॉ.पल्लवी दोडके, डॉ.सारंग दराडे यांच्यासह इतरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.




**मराठी पत्रकार परिषद आणि डिजिटल मिडिया परिषदेच्या वतीने दैनिक प्रजापत्र चे नवनिर्वाचित संपादक म्हणून आमचे स्नेही मित्र श्री.संजयजी मालाणी व कार्यकारी संपादक श्री.मंगेशजी निठुरकर यांनी सुत्रे हाती घेतली. ते वडवणी शहरात आल्यानंतर त्यांचा यथोचित सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे,वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष पत्रकार सतिश सोनवणे उपस्थित होते.**

# पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडून पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

बीड /प्रतिनिधी

मा. पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांनी काल दिनांक ०४/०१/२०२५ जिल्हय़ातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. त्यामध्ये१) पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांची केज पोलीस स्टेशन ते नियंत्रण कक्ष अशी विनंतीवरून २) पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांची केज पोलीस स्टेशन प्रभारी ३) पोलीस निरीक्षक सय्यद मजहरअली अबुतालीब यांची नियंत्रण कक्ष ते परळी ग्रामीण पोलीस स्टेशन प्रभारी४) पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे यांची नियंत्रण कक्ष ते केज पोलीस स्टेशन अशी बदली करण्यात आली आहे.





**नगरपंचायत आष्टी च्या स्वीकृत नगरसेवक पदी अरूण भैय्या निकाळजे ,बाळासाहेब घोडके यांची बिनविरोध निवड करण्यात आली आष्टी नगरपंचायतच्या नामनिर्देशक स्वकृत सदस्य पदासाठी दोन रिक्त जागेसाठी विशेष बैठक घेऊन आमदार सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली नगरसेवक म्हणून त्यांची निवड करण्यात आली त्यांच्या निवडीबद्दल नगरसेवक ,नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष, विभागीय अधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले.**

**छाया :( सुरेश कांबळे आष्टी )**

# उद्या बीड येथे संविधान बचाव जन आक्रोश मोर्चास मोठ्या संख्येने उपस्थित रहा :- भीमसैनिक प्रेम कांबळे

बीड येथील सर्व दलित बहुजन समाजातील संघटना एकत्र येऊन दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी बीड येथे संविधान बचाव जन आक्रोश मोर्चा निघणार असून, या मोर्चात सर्व संघटनांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे

परभणी येथील शहीद सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्ये प्रकरणी संबंधित पोलिसांवर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात यावा, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणारे गृहमंत्री अमित शहा यांचे मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी, परभणी येथे महिलावर अमानुष लाठीचार्ज करणाऱ्या पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यात यावेत, बीड येथील मसाजोग येथे सरपंच यांच्या मारेकर्यांना फाशीची शिक्षा व्हावी, देशातील सर्व निवडणुका मतपत्रिकेवर घेण्यात याव्यात शासकीय नोकरीतील गुत्तेदारी पद्धत रद्द करण्यात येऊन रिक्त असलेल्या राखीव जागा त्वरित भराव्यात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती दरमहा देण्यात यावी, शासकीय सेवेतील आरक्षणामधील वर्गीकरण कायदा रद्द करण्यात येऊन शिक्षणाचे राष्ट्रीयकरण करावे दिनांक सहा



जानेवारी रोजी बीडच्या जिल्हाधिकारी कार्यालयावर संविधान बचाव जन आक्रोश मोर्चा धडकणार आहे बीड शहरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून निघणारा हा मोर्चा माळवे सुभाष रोड, सत्यशोधक अण्णाभाऊ साठे पुतळा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे तरी दलित बहुजन आंबेडकरवादी संघटनाच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी बीड शहरातील

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT